**ठळक बातम्या**

- राज्यात लवकरच मेगा भर्ती प्रक्रिया सुरू करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची घोषणा

- रेशनच्या तांदळाची खरेदी आणि वितरणातल्या भ्रष्टाचारांच्या आरोपांची चौकशी करण्याचे विधानसभा अध्यक्षांचे निर्देश

- अमूल, मदर डेअरी प्रमाणे दुधाचा सामायिक ब्रँड निर्माण करण्याची राज्यपालांची सूचना

आणि

- आगामी जनगणनेची प्रक्रीया पुढच्या वर्षीच्या एप्रिलपासून सुरू होणार

**<><><><>**

राज्यात लवकरच मेगा भर्ती प्रक्रिया सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत केली. यासंदर्भातल्या एका लक्षवेधी सूचनेवर ते उत्तर देत होते. राज्य सरकारनं सत्तर हजार जागांची भर्ती जाहीर केली होती मात्र प्रत्यक्षात ती एक लाखाच्या वर पोहोचली आहे. आता १५० दिवसांच्या कार्यक्रमात सर्व विभागांना आकृतीबंध सुधारून, भर्तीसेवा नियम नव्यानं तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत, ते होताच मेगा भरती प्रक्रिया सुरू केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

**- - होल्ड - मुख्यमंत्री बाइट - -**

एकशे पन्नास दिवसांच्या कार्यक्रमात अनुकंपा तत्वावर प्रलंबित असलेली भरती पूर्ण केली जाणार आहे. सर्व जात वैधता तपासणी समित्या स्थापन केल्या आहेत, ही वैधता तपासणी करण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे, त्यामुळे ही कारवाई अधिक पारदर्शी आणि गतिमान होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

भर्ती प्रक्रियेत बनावट प्रमाणपत्रांना मान्यता देणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असं उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

**<><><><>**

राज्यात रेशनसाठी पुरवण्यात येणाऱ्या तांदळाच्या खरेदीत आणि वितरणात भ्रष्टाचार होत असल्याच्या आरोपाची चौकशी करून अधिवेशन संपण्यापूर्वी तो अहवाल सादर करावा, असे आदेश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज दिले. काँग्रेसच्या नाना पटोले यांनी काही दिवसांपूर्वी हा आरोप केला होता. त्यावरच्या प्रश्नादरम्यान अध्यक्षांनी हे आदेश दिले.

राज्यातल्या शासकीय रुग्णालयांमधे औषध खरेदीसाठी स्थानिक प्रशासनाला एकूण अर्थसंकल्प तरतुदीच्या ३० टक्क्यापर्यंत औषध खरेदीचे अधिकार दिले असल्याचं वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितलं. ही खरेदी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालच्या स्वतंत्र प्राधिकरणामार्फत केली जाते. मात्र, औषध खरेदीला विलंब होत असेल तर औषधं तातडीनं उपलब्ध व्हावीत यासाठी स्थानिक प्रशासनाला हे अधिकार दिले आहेत.

नंदुरबार जिल्ह्यात अक्कलकुवा इथं सुरू असलेल्या तेल भेसळीप्रकरणी संबंधित कारखाना तातडीनं बंद करून संबंधित अन्न आणि औषध प्रशासन सह आयुक्त तसंच सहाय्यक आयुक्त यांना निलंबित करण्याची घोषणा या विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केली.

**<><><><>**

कोणत्याही खासदारांना मराठी माणसाच्या कर्तबगारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा अधिकार नाही, असं निवेदन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत दिलं. भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी मराठी माणसांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्यावर ते बोलत होते. कायद्याच्या चौकटीत राहून आपलं मत मांडण्याचा अधिकार सर्वांना आहे, मात्र मराठी माणूस कुणी फेकलेल्या तुकड्यांवर जगत नाही. देशाच्या जीडीपीतलं मराठी माणसाचं योगदान काय आहे, याची माहिती त्या खासदारांनी घ्यावी, असा सल्ला त्यांनी नाव न घेता दुबे यांना दिला.

**<><><><>**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सरकारनं मांडलेल्या ५७ हजार ५०९ कोटी ७० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांपैकी काही निवडक विभागांच्या मागण्यांवर विधानसभेत चर्चा सुरू झाली. या मागण्यांना विरोध करताना, ही जनतेच्या

पैशाची उधळपट्टी असल्याचा आरोप काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी केला. अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर तीनच महिन्यांनी इतक्या मोठ्या रकमेच्या पुरवणी मागण्या मांडणं हे राज्यात आर्थिक नियोजन आणि खर्चाचं तारतम्य नसल्याचं लक्षण आहे, अशी टीका त्यांनी केली.

**<><><><>**

छत्रपती संभाजीनगरमधल्या एका हॉटेलच्या वादग्रस्त टेंडर प्रकरणी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट आणि त्यांच्या मुलावर नियमबाह्य सहभागाचा आरोप आज विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. त्यावर याची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी जाहीर केलं. ही प्रक्रिया रद्द केली आहे, आणि नव्यानं सर्व काही पारदर्शक पद्धतीनं केलं जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><>**

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या टीकेप्रकरणी त्यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला हक्कभंग प्रस्ताव आज विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी मंजूर केला. यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात भाजपचे विधान परिषदेतले गटनेते प्रवीण दरेकर यांनी विधान परिषदेत कुणाल कामरा यांच्या विरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल केला होता. सभापती राम शिंदे यांनी या प्रस्तावाला आज मंजुरी दिली असून हा प्रस्ताव आता विधान परिषदेच्या हक्कभंग समितीकडे पुढच्या चौकशीसाठी पाठवण्यात आला आहे.

**<><><><>**

महाराष्ट्रानं दूध उत्पादनात सहकाराच्या माध्यमातून अमूल, मदर डेअरी प्रमाणे दुधाचा सामायिक ब्रँड निर्माण करावा, अशी सूचना राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केली. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष तसंच सहकार मंत्रालय स्थापना दिनानिमित्त आज राजभवनात झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.  सहकार यशस्वी झाला तरच विकास सर्वसमावेशक होईल, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

आगामी जनगणनेची प्रक्रिया पुढच्या वर्षीच्या एप्रिलपासून सुरू होणार असल्याचं नोंदणी महासंचालक आणि जनगणना आयुक्त कार्यालयानं आज समाज माध्यमांवर जाहीर केलं. सुरुवातीला घरांची नोंदणी आणि मोजणी होईल. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची गणना होईल, त्यात जातनिहाय जनगणनेचा समावेश असेल असं त्यांनी कळवलं आहे. यासाठी १ जानेवारी २०२६ ते ३१ मार्च २०२७ दरम्यान प्रशासकीय सीमारेषांमध्ये कुठलेही बदल करू नये असं आवाहन जनगणना आयुक्तांनी सर्व राज्यं आणि केंद्र शासित प्रदेशांना केलं आहे.

**<><><><>**

आदिवासींनी आपली बलस्थानं ओळखून विविध क्षेत्रात प्रगतीची भरारी मारली पाहिजे, अशी अपेक्षा ज्येष्ठ लेखक, डॉक्टर श्रीपाल सबनीस यांनी आज पुण्यात व्यक्त केली. आदिवासी साहित्य आणि संस्कृती संवर्धन संस्था, बल्लारपूर आणि विदिशा विचार मंच, पुणे यांच्याद्वारे आयोजित आठव्या आदिवासी उलगुलानवेध साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या संमेलनाचं उद्घाटन महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचे कार्याध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांच्या हस्ते ग्रंथपूजन आणि माडियांच्या हाकुमी या वाद्याच्या वादनानं झालं.

**<><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्या त्या ठिकाणच्या परिस्थिती बघून लढविल्या जातील. याबाबतचा निर्णय आम्हाला आमचे वरिष्ठ नेते देवेंद्र फडनवीस जे सांगतील, तो त्या वेळी निर्णय आम्ही घेऊ, असं भाजपचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले, प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर पहिल्यांदाच ते परभणी इथं आले त्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली.

**<><><><>**

छत्रपती संभाजीनगर इथल्या विद्यादीप बालगृहातल्या ९ मुली निघून गेल्याच्या घटनेची राष्ट्रीय महिला आयोगानं दखल घेतली आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी पोलीस महासंचालकांना यासंदर्भात पत्र लिहिलं आहे. याप्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी असे निर्देश त्यांनी दिले आहेत. ३० जून रोजी या मुली पळून गेल्या होत्या. त्यापैकी ८ मुली सापडल्या आहेत.

**<><><><>**

'महापालिकेच्या प्रलंबित प्रकल्पांना वेग आला पाहिजे आणि त्यात प्रकल्पबाधितांना घरं दिली जात असताना मोकळ्या जागेवर कोणत्याही परिस्थितीत पुन्हा अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिले.

**<><><><>**

राज्यात येत्या २४ तासात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तर  मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. या चारही विभागात तुरळक ठिकाणी खूप जोरदार पावसाची आणि काही ठिकाणी मेघ गर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याचं वेधशाळेनं कळवलं आहे. कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाज आहे.

**//<><><><>//**